BEFORE THE NATIONAL GREEN TRIBUNAL

WESTERN ZONE BENCH, PUNE

**Original Application NO.135 of 2024(WZ)**

News Item Titled "7 Flamingos spotted near DPS Lake Wetland Killed activist blame CIDCO"S development plan " appearing in The Indian Express dated 28.04.2024.

... Applicant

VERSUS

Principle Chief Conservator of Forests & others ... Respondents

INDEX

| S.No. | Exhibit | Particulars | Page Nos. |
|---|---|---|---|
| 1. | R6 | Report of Committee dated 12.12.2024 in Marathi | 423 - 426 |
| 2. | R7 | Translation of above report | 427 - 432 |

Pune

Date:06/01/205

Advocate for the Respondent No.1

D.M.Gupte

9422317884 email-advgupte@gmail.com

R6

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
चौथा मजला, विस्तारित इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
ईमेल -:deskf१.rfd-mh@gov.in

मंत्रालयीन सेवा

क्रमांक :- डब्ल्यूएलपी-१२.२४/प्र.क्र.२३८/फ-१ दिनांक :-१२.१२.२०२४.

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

विषय :- मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथील I.A.No. २७७/२०२४ (WZ) in O.A. No. १३५/२०२४ (WZ) (earlier O.A. No.६३७/२०२४(PB) बाबत.

संदर्भ :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.विसता ०६.२४/प्र.क्र.११/फ-१, दिनांक ०५.०७.२०२४.
२) आपले पत्र क्रमांक :- MFN/DDR & CB/१३७६/२०२४-२५, दिनांक १०.१०.२०२४.
३) आपले पत्र क्र. कक्ष.३/DPS Lake Committee/७४२/२४-२५ दि.२७.११.२०२४

नेरूळ सीवुड्स (डीपीएस तलावाजवळ) येथील फलेमिंगो पक्षांचा नैसर्गिक अधिवास व कांदळवनाचे संरक्षण करण्याकरिता संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

२. मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथील I.A.No. २७७/२०२४ (WZ) in O.A. No. १३५/२०२४ (WZ) (earlier O.A. No.६३७/२०२४(PB) दाखल करण्यात आली असून त्यामध्ये दिनांक २१.१०.२०२४ रोजी मा. न्यायालयाने संदर्भ क्रमांक १ शासन निर्णयानुसार गठीत समितीचा चौकशी अहवाल दिनांक १०.०१.२०२५ रोजीच्या सुनावणीपूर्वी मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांचे समोर दाखल करण्याचे आदेश पारित केल्याचे आपण सदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

३. त्या अनुषंगाने आपण संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये शासन मान्यतेसाठी सादर केलेला सविस्तर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे. सदरची बाब आपल्या स्तरावरुन मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून देवून सदर समितीचा अहवाल मा. न्यायालयात सादर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(उदय ढगे)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

प्रतिलिपी :-
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 4461 दिनांक: 12 DEC 2024

Court Case

प्रशासकीय अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

# नेरुळ येथील फ्लेमिंगो पक्ष्यांचा नैसर्गिक अधिवास आणि कांदळवनाचे संरक्षण करण्याकरिता गठित केलेल्या समितीचा अहवाल

नवी मुंबई मधील नेरुळ सीउड्स येथील डी.पी.एस. तलावाजवळ फ्लेमिंगो पक्ष्याचा मृत्यू झाल्याची घटना विचारात घेता, तसेच सदर क्षेत्रामध्ये आढळून येणारे फ्लेमिंगो पक्ष्यांचे वास्तव्य पाहता त्यांचा नैसर्गिक अधिवास सुरक्षित करणे, तसेच आसपासच्या परिसरातील कांदळवनांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी या विषयाचा अभ्यास करण्याकरिता महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक : विसता 06.24/प्र.क्र.11/फ-1 दिनांक 05.07.2024 नूसार समिती गठित करण्यात आली.

सदर समितीमधील अध्यक्ष व सदस्य यांचा तपशिल खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| 1 | प्रधान सचिव (वने) | अध्यक्ष |
| 2 | प्रधान सचिव (पर्यावरण), पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | सदस्य |
| 3 | प्रधान सचिव (नगर विकास-1) नगर विकास विभाग | सदस्य |
| 4 | व्यवस्थापकीय संचालक, सिडको | सदस्य |
| 5 | आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| 6 | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मॅरीटाईम बोर्ड | सदस्य |
| 7 | जिल्हाधिकारी, ठाणे | सदस्य |
| 8 | श्री. प्रविण परदेशी, अध्यक्ष, बी. एन. एच. एस. | सदस्य |
| 9 | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष) | सदस्य सचिव |

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

1) डीपीएस तलाव येथिल फ्लमिंगो पक्ष्यांचा नैसर्गिक अधिवास सुरक्षित करण्याकरीता व्यवस्थापन आराखडा तयार करुन घेणे व त्यातील उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शिफारस करणे.
2) डीपीएस तलावाच्या आसपासच्या परिसरातील कांदळवन क्षेत्राचे संवर्धन करण्याकरीता शिफारस करणे.
3) मुंबई व ठाणे क्षेत्रातील कांदळवनाच्या क्षेत्रावर होणाऱ्या अतिक्रमणाचा अभ्यास करुन कांदळवन संरक्षणासंबंधी शिफारस करणे.

सदर समितीची पहिली बैठक दिनांक 16.07.2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत डीपीएस तलावाची सध्यस्थिती नोंद करण्याकरीता एक समिती गठीत करण्याचे ठरविण्यात आले आहे. सदर समितीमध्ये वन विभाग, सिडको, नवी मुंबई महानगरपालिका व BNHS यांचेमार्फत प्रत्येकी एक असे एकूण चार प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे. सदर संयुक्त स्थळपाहणी दिनांक 16.08.2024 रोजी करण्यात आली असून सदर स्थळपाहणीमध्ये सीडको, नवी मुंबई महानगरपालिका, बीएनएचएस व कांदळवन कक्ष महाराष्ट वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सदर स्थळपाहणीचा अहवाल दिनांक 23.09.2024 रोजी झालेल्या समितीच्या दुसऱ्या बैठकीत सादर करण्यात आला.

दिनांक 23.09.2024 रोजी झालेल्या समितीच्या दुसऱ्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

**1. डीपीएस तलाव येथिल फ्लमिंगो पक्ष्यांचा नैसर्गिक अधिवास सुरक्षित करण्याकरीता व्यवस्थापन आराखडा तयार करुन घेणे व त्यातील उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शिफारस करणे.**

i) अ) बीएनएचएस या संस्थेने डीपीएस तलावाचे फ्लेमिंगो पक्ष्यांकरीता असलेले महत्त्व याचा अभ्यास केला आहे. सदर अभ्यासाचा अहवाल बीएनएचएस या संस्थेने कांदळवन कक्षास सादर करावा.

ब) बीएनएचएस या संस्थेने सादर केलेला अहवाल कांदळवन कक्षाने भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडून यांना सादर करुन त्यांचे अभिप्राय घ्यावे.

क) सदर अहवालाबाबतीत भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडून चा अभिप्राय बीएनएचएस या संस्थेशी संलग्न असल्यास कांदळवन कक्षाने डीपीएस तलावाचे संरक्षण करण्यासाठी डीपीएस तलावाला 'Conservation Reserve' घोषित करण्यासाठी प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करावा. सदर प्रस्तावाची माहिती सिडको विभागाला सुद्धा देण्यात यावी. जेणेकरुन याबाबतीत सिडको विभागाला आपले मत शासनास कळविता येईल.

ii) सध्यस्थितीत संयुक्त स्थळ पाहणी अहवालामधील नमूद पॉईंट ३ आणि पॉईंट ४ मध्ये खाडीतून डीपीएस तलावामध्ये पाण्याचा प्रवाह सुरु आहे. सिडको यांच्या म्हणण्याप्रमाणे डीपीएस तलावाचा विकास हा विषय मा. सर्वोच्च न्यायालायाकडे न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय निर्गमीत होईपर्यंत फ्लेमिंगो व इतर स्थलांतरीत पक्षांच्या नैसर्गिक अधिवासाची हानी न होण्याकरीता संयुक्त पहाणीतील नमूद पॉईंट ३ आणि पॉईंट ४ मधून येणाऱ्या पाण्याचा प्रवाह रोखण्यात येऊ नये असे ठरविण्यात आले.

**2. डीपीएस तलावाच्या आसपासच्या परिसरातील कांदळवन क्षेत्राचे संवर्धन करण्याकरीता शिफारस करणे.**

i) डीपीएस तलावाच्या आसपासच्या परिसारातील कांदळवन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्र हे संरक्षीत असून सदर जागेवर कांदळवन कक्षाचे क्षेत्रीय अधिकारी व महाराष्ट्र सुरक्षा रक्षकांमार्फत सतत गस्त होत आहे. या व्यतिरिक्त सदर डीपीएस तलावाच्या परिसारातील इतर विभागाकडे जसे की सिडको, नवी मुंबई महानागरपालिका इत्यादीकडे असलेले कांदळवन क्षेत्र मा.उच्च न्यायालयाच्या आणि महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार ताब्यात घेण्यासाठी कार्यवाही कांदळवन कक्ष करेल.

ii) सदर क्षेत्र ताब्यात घेतल्यानंतर या क्षेत्राच्या संवर्धनाकरीता उपाययोजना कांदळवन कक्ष करेल.

**3. मुंबई व ठाणे क्षेत्रातील कांदळवनाच्या क्षेत्रावर होणाऱ्या अतिक्रमणाचा अभ्यास करुन कांदळवन संरक्षणासंबंधी शिफारस करणे.**

i) मुंबई ते ठाणे क्षेत्रातील कांदळवन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रावर झालेल्या अतिक्रमणावर वेळोवेळी कांदळवन विभाग दखल घेत असून कांदळवन क्षेत्रावर अतिक्रमण न होण्यासाठी वन विभागाचे व महाराष्ट्र सुरक्षा रक्षक नियमीत गस्त करतात आणि अधिक नियंत्रणाकरीता संवेदनशील कांदळवन क्षेत्रामध्ये सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. आजमितीस व्याप्त झालेल्या कांदळवन क्षेत्राची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी MRSAC, नागपूर यांना 30 सेंटीमीटर Resolution असलेले नवीन उपग्रह छायाचित्र वापरुप नवीन कांदळवन नकाशे तयार करण्याकरीता कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

ii) या व्यतिरिक्त इतर विभागाकडे असलेल्या / खाजगी व्यक्तिकडे असलेले कांदळवन क्षेत्र आणि कांदळवन क्षेत्र परिसरातील ५० मीटर बफर झोन यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एका खाजगी संस्थेची नेमणूक करण्यात आली. सदर संस्थेमार्फत कांदळवन क्षेत्रावर व ५० मीटर बफर झोन मध्ये होणाऱ्या बदलांबाबत मासिक अहवाल दिला जाईल.
सदर क्षेत्रावर अतिक्रमण, कांदळवन नष्ट होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या संबंधी सदर अहवाल सक्षम अधिकारी यांना पाठविण्यात येऊन त्यांचेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

माहितीसाठी सविनय सादर.

(एस. व्ही. रामाराव)
10/10/24
सदस्य सचिव तथा
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
कांदळवन कक्ष, मुंबई

R7

Translation

Logo of Forest Department | Official Emblem of India | Logo of Mantralaya Services Cadre

Truth Alone Triumphs

Government of Maharashtra

Revenue and Forest Department

Fourth Floor, Annex Building, Madam Cama Road, Hutatma Rajguru Square Mantralaya Mumbai 400 032 E mail : deskf1.rfd-mh@gov.in

No W L P – 12.24 / case no 238 / F – 1 Dated 12th December 2024

To

The Additional Principal Chief Conservator of Forests,

Mumbai

Subject : I A no 277 / 2024 ( W Z ) in O A no 135 / 2024 ( WZ ) ( earlier O A no 637 / 2024 ( P B ) before the Honorable National Green Tribunal Pune

Reference : 1. Revenue and Forest Department Government Resolution no V S T 06.24 / case no 11 / F – 1 dated 5th July 2024

2. Your letter no M F N / D D R & C B / 1376 / 2024 – 25 dated 10th October 2024

3. Your letter no Cell 3 / D P S lake committee / 742 / 24 – 25 dated 27th November 2024

A committee for the protection of the natural habitat of the flamingo birds and mangrove forests near the Nerul Seawoods ( D P S Lake ) vide Government Resolution no 1 under reference.

2. You have communicated vide letter under reference no 3 that I A no 277 / 2024 ( W Z ) in O A no 135 / 2024 ( WZ ) ( earlier O A no 637 /

The translation is done by Shri Sunil Bhagwat , Government Empanelled and Authorized Translator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / case no 29 / Bhasha 2 dated 22.03.2021

2024 ( P B ) has been submitted before the Honorable National Green Tribunal Pune, wherein the Honorable Court has directed to submit the inquiry report of the Committee constituted vide Government Resolution under reference no 1 before the Honorable National Green Tribunal Pune during the hearing on date 10th January 2025.

3. Incidental to the same, the detailed report submitted by you vide letter under reference no 2 is under the consideration of the Government. Government approval is granted to submit the aforesaid report before the Honorable Court and bring the same to the their notice from your level.

Enclosure : As above

SD /-

Uday Dhage

Officer on Special Duty

Revenue and Forest Department

Copy to :

The Additional Principal Chief Conservator of Forests ( Wild Life ), Maharashtra State, Nagpur

Additional Principal Chief Conservator of Forests ( Mangrove cell ) Mumbai

Inward no 4461 dated 12th December 2024

SD /- SD /-

Administrative Officer Additional Principal Chief Conservator of Forests

The translation is done by Shri Sunil Bhagwat , Government Empanelled and Authorized Translator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / case no 29 / Bhasha 2 dated 22.03.2021

1. To draft management design for securing the natural ecosystem of the flamingo birds in the Delhi Public School ( D P S ) lake and recommend measures for implementing the measures suggested therein.
2. To recommend measures for conservation of mangrove forests in the surrounding Delhi Public SchoolLake ( D P S ) and adjoining areas
3. To study the effect of encroachments on mangrove forests in Mumbai and Thane region and recommend measures for their conservation

The first meeting of the said committee was held on date 16th July 2024. It was decided to constitute a committee for recording the present status of the D P S lake. The said committee included four representatives – one each from the Forest Department, City and Industrial Development Corporation, New Mumbai Municipal Corporation and Bombay Nature History Society. The joint location visit has been conducted on date 16th August 2024 , wherein officials from the Forest Department, City and Industrial Development Corporation, New Mumbai Municipal Corporation and Bombay Nature History Society were present. Report of the said location visit was submitted in the second meeting of the committee held on date 23rd September 2024.

Following decisions were taken in the second meeting of the committee held on date 23rd September 2024.

1. To draft management design for securing the natural ecosystem of the flamingo birds in the Delhi Public School ( D P S ) lake and recommend measures for implementing the measures suggested therein.

( i ) a ) The Bombay Natural History Society has studied the significance of the Delhi Public School ( D P S ) lake for the flamingo birds . Bombay Natural History Society should submit the said report to the Mangrove Forests Cell .

The translation is done by Shri Sunil Bhagwat , Government Empanelled and Authorized Translator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / case no 29 / Bhasha 2 dated 22.03.2021

सुनिल

Report of the committee constituted for of the natural habitat of the flamingo birds and mangrove forests at Nerul

Considering the incident of flamingo birds' death near D P S lake near Nerul Seawoods and their existence in the said area, a committee was constituted vide Government of Maharashtra Revenue and Forest Department Government Resolution no V S T 06.24 / case no 11 / F – 1 dated 5th July 2024 for studying the measures to protect their habitat and the mangrove forests in the surrounding vicinity .

The details of the president and the members of the committee are as follows

| | | |
|---|---|---|
| 1 | Principal Secretary, ( Forests ) | President |
| 2 | Principal Secretary ( Environment ), Environment and Climatic Change Departmetn | Member |
| 3 | Principal Secretary ( Urban Development – 1 ), Urban Development Department | Member |
| 4 | Managing Director, City and Industrial Development Corporation Limited | Member |
| 5 | The Commissioner, New Mumbai Municipal Corporation | Member |
| 6 | The Chief Executive Officer, Maharashtra Maritime Board | Member |
| 7 | The District Collector, Thane | Member |
| 8 | Shri Pravin Pardeshi, President, B N H S | Member |
| 9 | The Additional Principal Chief Conservator of Forests ( Mangrove Forests Cell ) | Member Secretary |

The terms of reference of the said committee are as follows :

b ) The Mangrove Forests Cell should submit the said report submitted by the Bombay Natural History Society to the Indian Wild Life Institute at Dehradun and seek their opinion in the matter.

c ) If Society to the Indian Wild Life Institute at Dehradun concurs with the opinion expressed by the Bombay Natural History Society, the Mangrove Forests Cell should submit a proposal to the government for declaring the Delhi Public School ( D P S ) lake as a Conservation Reserve for protecting it.

ii ) It has been mentioned in point no 3 and 4 of the said joint location visit report that at present water from the creek is flowing into the D P S lake and City and Industrial Development Corporation has submitted that the matter of development of Delhi Public School ( D P S ) lake is sub judice with the Honorable Supreme Court. It was decided not to stop the water flow from the point no 3 and 4 into the Delhi Public School ( D P S ) lake till the Honorable Supreme Court rules in the said manner so as not to cause any damage to the natural habitat of the flamingos and other migratory birds.

2. To recommend for conservation of mangrove forests within the vicinity of the Delhi Public School ( D P S ) lake.

i ) The mangrove forests within the vicinity of the Delhi Public School ( D P S ) lake is a protected area and the Regional Officers of the mangrove forests cell and the Maharashtra Security Force personnel constantly patrol the area. Besides the mangrove forests cell should take steps to take the mangrove forests area in the possession various bodies such as City and Industrial Development Corporation and New Mumbai Municipal Corporation as directed by the Government of Maharashtra and the Honorable High Court from time to time.

The translation is done by Shri Sunil Bhagwat , Government Empanelled and Authorized Translator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / case no 29 / Bhasha 2 dated 22.03.2021

सुनील

ii) The mangrove forests cell shall take measures for conservation of the said area after taking the same into possession.

3. To study the encroachments on the mangrove forests in the Mumbai and Thane region and submit recommendations for their conservation

i) The mangrove cell is taking cognizance of the encroachments on the mangrove forests in the Mumbai and Thane region in their possession and Regional Officers of the mangrove forests cell and the Maharashtra Security Force personnel constantly patrol the area. Further the work of installing close circuit television cameras in the sensitive mangrove forests for ensuring proper control on such encroachments. Maharashtra Remote Sensing and Center has been assigned the work for drafting new mangrove forest maps using the 30 centimeter resolution new satellite images.

ii) Besides this, a private agency has also been engaged for controlling the 50 meter buffer zone in the mangrove forests area in the possession of various departments / private individuals. The said agency shall submit monthly report of the changes occurring in the mangrove forests and 50 meter buffer zone.

If any encroachment or damage to the mangrove forests is noticed, a report thereof should be submitted to the competent authority who should take further action in the matter. Humbly submitted for information please

SD /-

S D Ramarao

Additional Principal Chief Conservator of Forests

Mangrove Cell, Mumbai

The translation is done by Shri Sunil Bhagwat , Government Empanelled and Authorized Translator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / case no 29 / Bhasha 2 dated 22.03.2021

सुभग

BEFORE THE NATIUONAL GREEN TRIBUNAL, WESTERN ZON E, PUNE

Original Application No.135 of 2024

In the matter of :

News item titled "7 Flamingo spotted

Applicant

Versus

Principle Chief Conservator of Forests.

& others Respondents

**Report of Committee**

DATED 6h January,2025

D.M.GUPTE

ADVOCATE FOR RESPONDENT NO.1

3,LAXMAN APARTMENT

25/26, OLD TOPHKAHANA,

S'NAGAR, PUNE – 411 005

MOBILE : 9422317884

email: advgupte@gmail.com